सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, मिरज

मार्जा सैनिक वसाहती जवळ, एस.आय.डी.सी.एरिया, विद्यानगर, मिरज-४१६ ४१०.
दुरध्वनी क्रमांक - कार्यालय (०२३३) २२३१४२३ कार्यालय (०२३३) २२३१२६९
(Email : gpmiraj@gmail.com) (Website : www.gpmiraj.ac.in)

जा.क्र.शातंमि/प.वि./परिपत्रक/हि.प.२०२५/२०२५/ 1399 दिनांक 21 AUG 2025

**<u>अत्यंत महत्वाचे परिपत्रक</u> :-**

विषय -हिवाळी परीक्षा २०२५ परीक्षा अर्ज भरणे बाबत ...

संदर्भ - मा. सचिव म. रा. तं. मंडळ, मुंबई यांचे ॲकेडमीक कॅलेंडर जा. क्र. मरातंशिमं/का-४०/ॲकेडमीक कॅलेंडर/२०२५/१३६, दिनांक २२-०५-२०२५

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन या संस्थेतील सर्व विदयार्थ्यांना सुचित करण्यात येते कि हिवाळी परीक्षा २०२५ करीता बसणा-या सर्व विदयार्थ्यांनी खालील दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे Student Login मधून परीक्षेचे अर्ज भरुन त्यांची प्रिंट परीक्षा विभागातील श्री. एम. जी. कदम, कनिष्ठ लिपीक यांच्याकडे पडताळणी करून घेउन परीक्षा शुल्क रोखपाल यांचेकडे संस्थेच्या QR Code मार्फत ऑनलाईन भरणा करुन तदनंतर परीक्षा विभागात खालील प्रमाणे विहीत मुदतीत जमा करावे.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी जाहिर केलेले खालील प्रमाणे वेळापत्रक आहे.

| अ. क्र. | विना विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याची मुदत (रुपये ८५०/-) | विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याची मुदत (रुपये ८५० + २०० = १०५०/-) | विलंब शुल्क आणि दंडासह परीक्षा अर्ज भरण्याची मुदत (रुपये ८५० + १५०० = २३५०/-) |
|---|---|---|---|
| १ | दिनांक ०१-०९-२०२५ ते ०६-०९-२०२५ सायंकाळी ०५:०० वा. पर्यंत | दिनांक १३-०९-२०२५ ते १५-०९-२०२५ सायंकाळी ०५:०० वा. पर्यंत | दिनांक १७-०९-२०२५ ते १८-०९-२०२५ सायंकाळी ०५:०० वा. पर्यंत |

तरी संस्थेतील विदयार्थ्यांनी विभागनिहाय दिनांक ०१-०९-२०२५ ते ०६-०९-२०२५ या कालावधीत खालील वेळापत्रका प्रमाणे हिवाळी परीक्षा २०२५ करीता परीक्षा अर्ज कार्यालयातील परीक्षा विभागास सादर करावयाचे आहे.

| अ. क्र. | विभाग | कार्यालयातील परीक्षा विभागास अर्ज सादर करावयाचा कालावधीचा दिनांक |
|---|---|---|
| १ | व्दितीय व तृतीय वर्ष पॉलिमर टेक्नॉलॉजी | ०१-०९-२०२५ |
| २ | व्दितीय व तृतीय वर्ष मेडी. ईले. | ०२-०९-२०२५ |
| ३ | व्दितीय व तृतीय वर्ष संगणक अभि. | ०३-०९-२०२५ |
| ४ | व्दितीय व तृतीय वर्ष स्थापत्य अभि. | ०४-०९-२०२५ |
| ५ | व्दितीय व तृतीय वर्ष यंत्र अभि. | ०५-०९-२०२५ & ०६-०९-२०२५ |

सदर विदयार्थ्यांनी परीक्षा अर्जाची प्रत आणि परीक्षा शुल्क रोखपाल विभागात QR Code मार्फत ऑनलाईन पदधतीने रक्कम जमा करुन UPI/UTR No.Detail माहिती सहीत असलेली स्क्रिनशॉटची प्रिंट काढून परीक्षा अर्जासोबत जोडून संस्थेत प्रत्यक्ष येऊन परीक्षा विभागात श्री.एम. जी. कदम, कनिष्ठ लिपीक यांचेकडे वरील प्रमाणे नमूद केलेल्या वेळेतच भरावयाचा आहे.

मुदतीनंतर कोणत्याही कारणास्तव परीक्षा अर्ज भरुन घेतला जाणार नाही. त्यास होणा-या नुकसानीस विदयार्थी स्वतः जबाबदार राहील याची नोंद घ्यावी. संस्थेस शासकीय सुटटी असली तरी त्या दिवशी कार्यालय सुरु राहील. परीक्षा फी ही रोख स्वरुपात स्विकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(डॉ. संजय अर्जुनसिंग परदेशी)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, मिरज

प्रत - १ . सर्व विभाग प्रमुख/प्र.विभाग प्रमुख/प्र. अधिकारी यांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

२/- सर्व विभागप्रमुख यांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक हिवाळी परीक्षा २०२५ परीक्षा अर्ज भरणे करीता आपल्या विभागातील विदयार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयावे. तसेच परीक्षा अर्ज भरण्यास प्रोत्साहित करावे. जेणे करुन कोणताही नियमित विदयार्थी हिवाळी परीक्षा २०२५ च्या परीक्षा अर्ज भरण्यापासून वंचित राहणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी विभाग प्रमुख यांची राहील. सदरचे परिपत्रक आपले विभागातील अधिकारी/ कर्मचारी व सर्व विदयार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयावे.

| | | | |
|---|---|---|---|
| स्थापत्य विभाग | यंत्र विभाग | संगणक विभाग | मेडीकल ईलेक्ट्रॉनिक्स विभाग |
| पॉलिमर टेक्नॉलॉजी विभाग | विज्ञान व मानव्यशास्त्र विभाग | | |

२. विदयार्थी नोटीस बोर्ड

३. रोखा विभागास माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

४. श्रीमती प्रियंका व्ही. तोरसकर, अधि. संगणक यांनी सदरचे परीपत्रक संस्थेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणे करीता .